उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयातील संच मान्यता व शिक्षकांना मान्यता देण्याबाबत सुसूत्रता आणणे.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
शासन निर्णय क्रमांक : एचएससी १७०४/(३६३/०४)/उमाशि-१
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई- ४०० ०३२
दिनांक : ४ जुलै, २००७.

वाचा- : - १) शिक्षण संचालक,माध्यमिक व उच्च माध्यमिक,महाराष्ट्र राज्य पुणे यांचे पत्र क्रमांक : एचएससी १५२००४/बैठक/१२ एचएस, दिनांक २८.१२.२००४.
२) शासन निर्णय, शालेय शिक्षण विभाग क्रमांक : एसएसएन २६९६/३१७४४/(६११/९६)/माशि-२, दिनांक १३.८.१९९६
३) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्रमांक: एचएससी १३०५/(६३/०५)/उमाशि-१, दिनांक १.१२.२००५
४) शासन परिपत्रक ,शालेय शिक्षण विभाग, क्रमांक :एचएससी १३९९/२८९२२(२३७०)/उमाशि-१, दिनांक २४.११.२०००.

**प्रस्तावना :-** उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयातील संच मान्यता देताना तसेच कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांना मान्यता देताना क्षेत्रिय स्तरावर येणाऱ्या अडचणींबाबत सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक व त्यांच्या कार्यालयातील उच्च माध्यमिकचे काम करणाऱ्या सहाय्यक संचालक यांची एक संयुक्तिक बैठक शिक्षण संचालक ( माध्यमिक व उच्च माध्यमिक ),महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे अध्यक्षतेखाली दिनांक २९.११.२००४ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीमध्ये उच्च माध्यमिक स्तरावरील शिक्षक मान्यता देताना ज्या अडीअडचणी किंवा प्रश्न विभागीय पातळीवर निर्माण झालेले आहेत, त्याचप्रमाणे शासन आदेशामध्ये सुसूत्रता आणण्याच्या दृष्टीने काही दुरुस्त्या करण्याबाबत सविस्तरपणे चर्चा करण्यात आलेली आहे. त्यामध्ये प्रामुख्याने शिक्षकांचा आवश्यक असलेला कार्यभार, तासिकांची संख्या, तासिकांचा कालावधी, प्रत्येक तुकडीतील विद्यार्थी संख्या याबाबत चर्चा करण्यात आली. ज्या बाबी धोरणात्मक आहेत, त्या प्रकरणी संचालनालयाच्या स्तरावरुन मार्गदर्शन करणे आवश्यक आहे, त्या प्रकरणी संचालनालयाने कार्यवाही करावी असेही ठरले. शासन स्तरावरुन ज्या प्रकरणी आदेश निर्गमित करावयाचे आहेत, त्या मुद्यांबाबतचा सविस्तर प्रस्ताव शिक्षण संचालकांच्या उपरोक्त वाचा येथील दिनांक २८.१२.२००४ रोजीच्या पत्रान्वये शासनास सादर करण्यात आलेला आहे. त्याअनुषंगाने सुधारित आदेश निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-** (१) उच्च माध्यमिक विद्यालय/ कनिष्ठ महाविद्यालय इ. ११ वी व १२ वी साठी प्रत्येक तासिकांचा कालावधी ४० मिनिटे गृहित धरुन त्या त्या विषयांचा कार्यभार गणना करणे .

प्रत्येक विभागीय स्तरावर उच्च माध्यमिकच्या तासिकांचा कालावधी वेगवेगळा असल्याचे दिसते. ढोबळमानाने प्राथमिक स्तरावर ३० मिनिटांची तासिका, माध्यमिक स्तरावर ३५ मिनिटांची तासिका, उच्च माध्यमिक स्तरावर ४० मिनिटांची तासिका, वरिष्ठ महाविद्यालयात ४५ मिनिटांची तासिका तसेच पदव्युत्तर स्तरावर

५० ते ५५ मिनिटांची तासिका असते. वरिष्ठ महाविद्यालयांना जोडलेल्या कनिष्ठ महाविद्यालयात ४५ मिनिटांची तासिका असून माध्यमिक शाळेला जोडलेल्या कनिष्ठ महाविद्यालयात ३५ मिनिटांची तासिका याप्रमाणे कार्यभार गणना होत आहे. त्यामुळे माध्यमिक स्तरावर ३५ मिनिटांच्या तासिकांनुसार कार्यभार गणना होऊन प्रत्येक तासिकेमागे ५ मिनिटांचा कमी कार्यभार गणना होते. त्यामुळे दोन्ही ठिकाणी सुसूत्रता असण्याच्या दृष्टीने दोन्ही स्तरावर ४० मिनिटांची तासिका गणण्यात यावी. त्याप्रमाणे तासिकांची गणना केल्यास एकसारखेपणा येईल. मात्र यामुळे माध्यमिक शाळा व संलग्न कनिष्ठ महाविद्यालय यामधील कामाच्या वेळेत बदल होईल.

(२) उच्च माध्यमिक स्तरावरील वैकल्पिक विषयांबाबत

उच्च माध्यमिक स्तरावर एकूण ६ विषय अभ्यासले जातात. यामध्ये (१) इंग्रजी, (२) आधुनिक भारतीय भाषा किंवा आधुनिक परकीय भाषा व (३) ४ वैकल्पिक विषय यांचा समावेश आहे. याप्रमाणे विद्यार्थी विषयांची निवड करतात. परंतु एकूण ४५ वैकल्पिक विषयांची संख्या अभ्यासक्रम पुस्तिकेत दिलेली आहे. प्रत्येक कनिष्ठ महाविद्यालयामध्ये वैकल्पिक विषयास मान्यता देताना विविध पध्दतीचा अवलंब करतात. ज्या ठिकाणी नवीन विषय सुरु करण्यासाठी कमीत कमी १० किंवा २० विद्यार्थी असल्यास नवीन विषय सुरु करण्यास परवानगी देण्यात आली आहे. तथापि, कमी विद्यार्थी संख्येमुळे काही विभागामध्ये जास्तीत जास्त विषयांना मान्यता देऊन जास्तीत जास्त शिक्षकांना मान्यता दिल्याचे आढळून येते. वास्तविक पाहता, कला, वाणिज्य शाखा असलेल्या प्रत्येक तुकडीसाठी दोन पूर्णवेळ शिक्षक व विज्ञान शाखेच्या तुकडीसाठी २.५ पूर्णवेळ शिक्षकांची मान्यता देण्याची तरतूद आहे. त्यामुळे या तुकड्यांसाठी किती वैकल्पिक विषय सुरु ठेवण्यात यावेत, याबाबत स्पष्ट करण्यात येते की, विविध वैकल्पिक विषयांसाठी उपलब्ध तुकडयांमधील विद्यार्थी संख्या एकत्रित करुन ( सरासरी हजेरीची अट पूर्ण होण्यासाठी ) कार्यभार गणना करण्यात यावी. उदा. इ.११वी व १२ वी च्या अ,ब,क व ड अशा चार तुकड्या आहेत. यामध्ये अ-३०,ब-२०,क-२०, ड-२५ अशी विद्यार्थी संख्या असल्यास प्रत्येक तुकडीचा स्वतंत्र कार्यभार न गणता अ+ ब + क + ड यामधील विद्यार्थी संख्या एकत्रित करुन कार्यभार गणना करावी. वैकल्पिक विषय सुरु करण्यास ग्रामीण भागात कमीत कमी २५ ते ३० विद्यार्थी, शहरी भागात ३५ ते ४० विद्यार्थी असे निकष असावेत.

(३) उच्च माध्यमिक स्तरावर शिकविणाऱ्या शिक्षकांच्या कार्यभाराबाबत.

उपरोक्त वाचा येथील दिनांक २४.११.२००० च्या शासन निर्णयानुसार उच्च माध्यमिक स्तरावरील पदव्युत्तर पदवी विषयाचा किमान ३/४ कार्यभार उपलब्ध असल्यास व उर्वरित १/४ कार्यभार माध्यमिक स्तरावरील किंवा महाविद्यालयीन स्तरावरील देण्यात येऊन, सदर शिक्षकास पूर्णवेळ कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक म्हणून मान्यता देण्यात यावी, अशा प्रकारचे आदेश आहेत. वास्तविक पाहता, पदव्युत्तर पदवी विषयाचा किमान ३/४ कार्यभार उपलब्ध असल्यास व उर्वरित १/४ कार्यभार माध्यमिक शाळा किंवा महाविद्यालयीन स्तरावरील कार्यभार देण्यात यावा, असा शासन निर्णयाचा अर्थ आहे. सध्या महाविद्यालयीन स्तरावर नेट सेट धारक शिक्षकांची निवड होत असल्याने १/४ कार्यभार महाविद्यालयीन स्तरावर उपलब्ध होत नाही. त्यामुळे सदर कार्यभार फक्त माध्यमिक स्तरावरच देण्यात यावा. वरिष्ठ महाविद्यालयाचा १/४ कार्यभार उच्च माध्यमिक स्तरावर धरावयाचा असेल तर कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकाला वरिष्ठ महाविद्यालयाचा कार्यभार दिल्याबाबतचे प्रमाणपत्र संबंधित

महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी देणे आवश्यक राहील. तसेच याबाबतची मान्यता संबंधित सहसंचालक ( उच्च शिक्षण) यांचेकडून घेण्यात आल्याचे संबंधित प्राचार्यांकडून लेखी प्रमाणपत्र घेणे आवश्यक राहील. माध्यमिक स्तरावर व वरिष्ठ महाविद्यालय स्तरावर १/४ कार्यभार उपलब्ध नसल्यास या प्रकरणी पूर्णवेळ उच्च माध्यमिक शिक्षक म्हणून मान्यता देता येणार नाही. तसेच उपरोक्त वाचा येथील दिनांक १.१२.२००५ च्या शासन निर्णयान्वये ज्या उच्च माध्यमिक शाळेत/ कनिष्ठ महाविद्यालयात शिक्षकाला पदव्युत्तर विषयातील १७/१८ घड्याळी तासाच्या ३/४ कार्यभार उपलब्ध होत नाही, तेथे ह्या शिक्षकाचा पदव्युत्तर विषयाचा ५० टक्के व पदवी पातळीवरील एका विषयाचा ५० टक्के कार्यभार विचारात घेऊन, त्या शिक्षकाला पूर्णवेळ मान्यता द्यावी व त्याने तीन ते चार वर्षात दुसऱ्या विषयातील पदव्युत्तर पदवी उत्तीर्ण करावी, असे आदेश आहेत. त्याचप्रमाणे ९ ते १७ घड्याळी तास कार्यभार उपलब्ध असल्यास अर्धवेळ शिक्षक म्हणून व ९ पेक्षा कमी घड्याळी तास उपलब्ध असल्यास, घड्याळी तासांवर शिक्षक म्हणून मान्यता देण्यात यावी.

(४) शारीरिक शिक्षक म्हणून मान्यता.

उच्च माध्यमिक स्तरावर पदव्युत्तर पदवी द्वितीय श्रेणी अधिक बी.पी.एड्. किंवा समकक्ष अर्हताधारक शिक्षकांना उच्च माध्यमिक शारीरिक शिक्षण शिक्षक म्हणून मान्यता देण्याची तरतूद आहे. तथापि, शारीरिक शिक्षकांसाठी उच्च माध्यमिक स्तरावर पूर्ण कार्यभार उपलब्ध होत नाही. अशा ठिकाणी तासिका स्तरावर शारीरिक शिक्षक म्हणून शिक्षक उपलब्ध होत नाहीत. त्यामुळे माध्यमिक स्तरावरील शारीरिक शिक्षकांना उच्च माध्यमिक स्तरावर १/४ कार्यभार उपलब्ध असल्यास माध्यमिक स्तरावरील शारीरिक शिक्षण शिक्षकास माध्यमिक शाळेतील वेतनश्रेणी देऊन, पूर्णवेळ माध्यमिक स्तरावरील शिक्षक म्हणून मान्यता देण्यात यावी. अशा शिक्षकास माध्यमिक स्तरावरील ३/४ कार्यभार व उच्च माध्यमिक स्तरावरील १/४ कार्यभार आवश्यक राहील.

(५) कनिष्ठ महाविद्यालय/ उच्च माध्यमिक विद्यालयाचे तुकडी मंजूरीचे निकष सुधारण्याबाबत.

शासन निर्णय, दिनांक ६ मे, १९७६ नुसार तुकड्यांची पटसंख्या निश्चित करण्यात आलेली आहे. सद्य:स्थितीत माध्यमिक शाळा संलग्न उच्च माध्यमिक विद्यालयातील तुकड्यांची प्रवेश क्षमता ८० असून वरिष्ठ महाविद्यालय संलग्न कनिष्ठ महाविद्यालयांची प्रवेश क्षमता १२० अशी आहे. त्यामध्ये तुकड्यांना मान्यता देताना व अनुदानास पात्र ठरवितांना पुढीलप्रमाणे निकष असावेत :-

<u>वरिष्ठ महाविद्यालय संलग्न कनिष्ठ महाविद्यालय.</u>

<u>शहरी भाग</u>

| पटसंख्या | तुकडी संख्या | एका तुकडीची सरासरी हजेरी |
|---|---|---|
| ६० ते १३० | १ तुकडी | ७० पूर्ण अनुदान |
| १३१ ते २५० | २ तुकड्या | |
| २५१ ते ३७० | ३ तुकड्या | |
| ३७१ ते ४९० | ४ तुकड्या | |
| ४९१ ते ६१० | ५ तुकड्या | |
| ६११ ते ७३० | ६ तुकड्या | |

ग्रामीण भाग

| पटसंख्या | तुकडी संख्या | एका तुकडीची सरासरी हजेरी |
|---|---|---|
| ५० ते ८० | १ तुकडी | ५० पूर्ण अनुदान |
| ८१ ते १४० | २ तुकड्या | |
| १४१ ते २०० | ३ तुकड्या | |
| २०१ ते २६० | ४ तुकड्या | |
| २६१ ते ३२० | ५ तुकड्या | |

माध्यमिक शाळा संलग्न उच्च माध्यमिक विद्यालय.

**शहरी भाग**

| पटसंख्या | तुकडी संख्या | एका तुकडीची सरासरी हजेरी |
|---|---|---|
| ५० ते ८० | १ तुकडी | ५० पूर्ण अनुदान |
| ८० ते १४० | २ तुकड्या | |
| १४१ ते २०० | ३ तुकड्या | |
| २०१ ते २६० | ४ तुकड्या | |
| २६१ ते ३२० | ५ तुकड्या | |

**ग्रामीण भाग**

| पटसंख्या | तुकडी संख्या | एका तुकडीची सरासरी हजेरी |
|---|---|---|
| ५० ते ६० | १ तुकडी | ५० पूर्ण अनुदान |
| ६१ ते ११० | २ तुकड्या | |
| १११ ते १५० | ३ तुकड्या | |
| १५१ ते २०० | ४ तुकड्या | |
| २०१ ते २५० | ५ तुकड्या | |

**रात्रशाळा कनिष्ठ महाविद्यालय**

| पटसंख्या | तुकडी संख्या | एका तुकडीची सरासरी हजेरी |
|---|---|---|
| ३५ ते ४० | १ तुकडी | ३५ पूर्ण अनुदान |
| ४१ ते ८० | २ तुकड्या | |
| ८१ ते १२० | ३ तुकड्या | |
| १२१ ते १६० | ४ तुकड्या | |

आदिवासी विभाग व मुलींच्या सरासरी हजेरीबाबतचे प्रचलित असलेले निकष योग्य असल्याने त्यात बदल करण्याची आवश्यकता नाही.

(६) अर्धवेळ शिक्षक मान्यता.

शासन निर्णय, दिनांक १३.८.१९९६ नुसार एखाद्या संस्थेमध्ये दोन शाळांमधून अर्धवेळ / अंशकालीन काम करणाऱ्या मान्यताप्राप्त कर्मचाऱ्यांचा कार्यभार पूर्णवेळ कर्मचा-यांइतका असेल तर अशा कर्मचा-यांस लाभ देताना

या दोन शाळांमध्ये अंतर किती असावे, त्याचप्रमाणे अर्धवेळ पदास आरक्षण लागू करावे किंवा कसे याबाबत स्पष्ट करण्यात येते की, वरीलप्रमाणे कार्यभार असणाऱ्या शिक्षकास वरील दोन शाळांमध्ये उपलब्ध असलेला कार्यभार त्यांनी दिलेल्या वेळेत पूर्ण केल्यास त्या ठिकाणी ठराविक अंतराची मर्यादा नसावी. परंतु सोपविलेले काम दिलेल्या वेळेत अंतराअभावी पूर्ण होत नसेल तर असा कार्यभार मान्य करता येणार नाही. अशा शिक्षकांचा पगार कोणत्या शाळेत काढावा या संदर्भात स्पष्ट करण्यात येते की, एकाच व्यवस्थापनाच्या दोनही पदांपैकी जे पद प्रथम निर्माण झाले आहे ते पद पूर्णवेळ करुन त्या ठिकाणी त्याचा पगार काढण्यात यावा किंवा अशा कर्मचाऱ्यांचे वेतन व्यवस्थापनामार्फत सुचविलेल्या शाळेतून काढण्यात यावे. भविष्यात हा शिक्षक पूर्णवेळ झाल्यास या पूर्णवेळ पदावर या शिक्षकास प्रथम पूर्णवेळ कार्यभार देणे, संस्थेस बंधनकारक राहील. त्यामुळे अर्धवेळ शिक्षकास आरक्षण लागू राहील.

(७) वरिष्ठ महाविद्यालय संलग्न कनिष्ठ महाविद्यालयाची बिंदू नामावलीबाबत.

वरिष्ठ महाविद्यालयाला जोडलेल्या कनिष्ठ महाविद्यालयांची बिंदू नामावली स्वतंत्र ठेवण्यात यावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २००७०७०४१२३३५३००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

(अ.मा.मड्डलवार)
उपसचिव,महाराष्ट्र शासन

प्रति,
शिक्षण संचालक ( माध्यमिक व उच्च माध्यमिक ),महाराष्ट्र राज्य,पुणे(५ प्रती )
सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक.
सर्व शिक्षणाधिकारी( माध्यमिक ) जिल्हा परिषद.
शिक्षण निरीक्षक (दक्षिण /उत्तर/पश्चिम),मुंबई
अवर सचिव( माशि-२/उमाशि-२),शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय,मुंबई-३२
निवड नस्ती - कार्यासन -उमाशि-१